RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ७१] शुक्रवार, मे २६, २०२३/ ज्येष्ठ ५, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ मे, २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२१/अ.नौ.सं.क्र.१२/प्र.क्र.१०७/म-१(धोरण).- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेला शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२०२१/अ.नौ.सं.क्र.१२/प्र.क्र.१०७/म-१(धोरण), दिनांक ३१ मार्च २०२१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त आदेश" असा केला आहे) याद्वारे, "महिला /महिला खरेदीदार/ खरेदीदांर आणि कोणताही विक्रेता किंवा उक्त दस्तऐवजाचा किंवा संलेखाचा अन्य निष्पादक यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या किंवा निष्पादित करण्यात येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या निवासी युनिटाच्या अभिहस्तांतरणाच्या किंवा करारनाम्याच्या दस्तऐवजावर किंवा संलेखावर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची- एकच्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क, उक्त आदेशामध्ये नमूद केलेल्या शर्तींच्या अधीन राहून, एक टक्क्याने कमी केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याबद्दल त्याची खात्री पटल्याने, अशा प्रकारच्या निवासी युनिटाच्या खरेदीच्या तारखेपासून १५ वर्षांच्या कालावधीमध्ये त्या नंतरच्या कोणत्याही पुरुष खरेदीदारास/खरेदीदारांस अशा प्रकारच्या निवासी युनिटाची विक्री करण्यावर निर्बंध घालण्याकरिता शर्त क्रमांक (२) वगळण्यासाठी उक्त आदेशात सुधारणा करणे इष्ट असल्याचे वाटत आहे ;

त्याअर्थी,आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याबद्दल त्याची खात्री पटल्याने, याद्वारे, उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामधील, शर्त क्रमांक (२) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे उप सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 26th May, 2023.

***Order***

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2021/U.O.R.No.12/C.R.107/M-1(Policy).— Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Order, Revenue and Forests Department, No.Mudrank-2021/U.O.R.No.12/C.R.107/M-1(Policy), dated the 31st March 2021 ( hereinafter referred to as "the said Order"), issued in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), reduced the stamp duty by One per cent, as otherwise chargeable under clause (*b*) of Article 25 of Schedule–I appended to the said Act, on the document or instrument of Conveyance or Agreement to Sell of any type of residential unit, executed or being executed between, "the Women /Women Purchaser/s and any Seller or other executant of the said document or instrument ", subject to the conditions mentioned in the said Order ;

And Whereas, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, considers it expedient to amend the said Order to delete the condition number (*2*) to restrict the sale of such type of residential unit to any subsequent Male Purchaser/s within the period of 15 years from the date of purchase of such type of residential unit.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby amends the said Order, as follows, namely :—

In the said Order, condition Number (*2*) shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.